वि. दि. दावा क्र. ०१-२०२३
निशाण क्र. ४०१ ची पुरवणी

**वादी यांचे साक्षीदार क्र. १ यांचे ज्यादा सरतपासणीवर उलटतपासणी प्रतिवादी क्र. ९ चे वारसांतर्फे तर्फे वकील श्री. पाटील यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

प्रतिवादी क्र. १ ते १४ व त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब त्यांचे वतीने वादीच्या अधिक सरतपासावर कोणताही उलटतपास नाही.

**वादी यांचे साक्षीदार क्र. १ यांचे ज्यादा सरतपासणीवर उलटतपासणी प्रतिवादी क्र. १५५ चे वारसांतर्फे तर्फे वकील श्री. एस.ए.रोकडे यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

हे म्हणणे खरे आहे की, दि. १३–१२–२०११ रोजी झालेल्या खरेदी खताची नोंद महसुल दप्तरी झालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, ०.४० आर. जमिन प्रतिवादी क्र. १५ याने त्यांच्या मुलाच्या शिक्षणाच्या खर्चासाठी तारण म्हणून राजेंद्र जगताप यांना दिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत ही तारण म्हणून दिलेली असल्यामुळे त्या खरेदी खतातील लिहून देणार व घेणार यांनी त्याची नोंद महसुल दप्तरी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ती जमिन राजेंद्र जगताप यांचेकडून प्रतिवादी क्र. १५ भानुदास बोराटे यांनी घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे दाव्यात खरेदी खत रद्यबातल करण्यात यावे अशी मागणी केलेली नाही. मला वाचता येत नाही परंतू सही पुरते ज्ञान आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे विधिज्ञांनी वादपत्र तयार केले व त्यावर मी केवळ स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे वादपत्राच्या प्रार्थने मध्ये खरेदी खत रद्य बातल व्हावे म्हणून मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही क,मी माझे प्रार्थने नुसार न्यायालयीन शुल्क भरलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३–१२–२०११ रोजीचे खरेदीखतावर योग्य ते न्यायालयीन शुल्क दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे सरपासणी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि. ०४–०४–२०२५